| MHPU240017052024 | **रे.मु.नं. १८५/२०२४**<br>**सचिन लोंढे व इतर**<br>विरुद्ध<br>**रामचंद्र लोंढे व इतर** |
|---|---|

**निशाणी क्र.१८ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.१ व २ यांचेविरुद्ध निशाणी क्र.५ वरील मनाई अर्जावरील आदेशापर्यंत दावा मिळकतीबाबत तबदीलीचे कोणतेही व्यवहार करु नये अशी 'जैसे थे' परिस्थिती ठेवणेचा आदेश मिळणेकामी दाखल केलेला आहे.

**०२.** वादीतर्फे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची वडिलोपार्जित जमीन आहे. सदर जमिनीचे अद्याप सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. असे असतांना, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रतिवादी क्र.५ व ६ यांना दावा मिळकतीतील काही क्षेत्र तबदील केलेले आहे. त्यामुळे, वादीने वाटप होउन ठरावाकरीता दावा दाखल केला असुन दाव्याकामी मनाई अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ व २ हे दावा मिळकतीतील क्षेत्र ति—हाईत इसमांना तबदील करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे, मनाई अर्जाचा निर्णय होईपर्यंत दावा मिळकतीचे खरेदी—विक्रीबाबत जैसे थे परिस्थिती ठेवणे आवश्यक आहे. सबब, वादीचा जैसे थे परिस्थिती ठेवणेबाबतचा अर्ज मंजूर करणेत यावा.

**०३.** प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादीस नुकतेच दाव्याचे समन्स व नोटीस मिळाली असुन ते आज रोजी दाव्याकामी वकीलपत्र देउन हजर होत आहेत. प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करण्यासाठी मुदत मागितलेली आहे. दावा मिळकतीसंबंधी महत्वाची कागदपत्रे पाहुन प्रतिवादी यांना कैफियत देणे आवश्यक आहे. सबब,

वादी यांचा जैसे थे परिस्थिती ठेवण्याबाबतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली.

**०४.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. दावा, अर्ज व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. सदरचा दावा वादीने प्रतिवादींविरुद्ध वाटप व ठरावाकरीता दाखल केला आहे. आज रोजी प्रतिवादी क्र.१, २ व ५ हे दाव्याकामी हजर राहुन त्यांनी कैफियत व म्हणणे देण्यास मुदत मागितलेली आहे. वादी यांचे कथनानुसार, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची वडिलोपार्जित मिळकत असुन प्रतिवादी क्र.१ व २ हे दावा मिळकत विकण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे, वादीचे नुकसान होणार आहे. दावा मिळकतीचे स्वरुप पाहता दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचे हक्क अधिकार गुंतले असल्याचे दिसुन येते. अशा परिस्थितीत, कोणताही आदेश पारीत करण्याआधी प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर येणे देखील आवश्यक आहे. अशा परिस्थितीत, वादीने मागणी केल्याप्रमाणे आदेश पारीत करणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे, मी खालील आदेश पारीत करत आहे:

## <u>आदेश</u>

वादीचा अर्ज निशाणी क्र.१८ नामंजूर करण्यात येतो.

MEGHA SHASHIKANT MALI
Digitally signed by MEGHA SHASHIKANT MALI
Date: 2024.10.25 19:01:37 +0530

**(श्रीमती एम. एस. माळी)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
घोडेगांव, जि. पुणे.

दि.: २४/१०/२०२४
स्थळ : घोडेगांव